


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक ३६२, बुधवार ६ नोव्हेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## लंके विरोधी नेत्यांची वज्रमुठ सुटली!

■ माधवराव लामखडे , डॉ.श्रीकांत पठारे यांची माघार ■ सुजित झावरेंच्या पाठिंब्याचा दातेंना फायदा ■ संदेश कार्लेंच्या बंडखोरीचा राणीताईंना फटका ?

पारनेर : नाना करंजुले

**पारनेर - नगर विधानसभा मतदारसंघात खासदार नीलेश लंके यांच्या विरोधात विरोधी पक्षातील नेत्यांनी काही दिवसांकरता वज्रमुठ बांधली होती. याकरता अजित पवार यांनी पाठबळ दिले होते. इतकेच नाही तर उपमुख्यमंत्र्यांनी पारनेर बाजार तळावर सभा घेऊन या निवडणुकीत एकसंध राहण्याचे आवाहन केले होते. मात्र काशिनाथ दाते यांची उमेदवारी जाहीर होताच. त्याचबरोबर तुतारीचे अर्ज भरताना झालेले शक्तिप्रदर्शन या सर्व पार्श्वभूमीवर तात्पुरते एकीचे बळ दाखवणारे नेते एकत्र राहिले नाही.माधवराव लामखडे यांनी काही दिवसातच शरद पवार यांच्या राष्ट्रवादीमध्ये जाण्याचा निर्णय घेतला. तर शिवसेनेचे तालुकाप्रमुख डॉ .श्रीकांत पठारे यांनी सुद्धा माघार घेतली. या पार्श्वभूमीवर राणीताई लंके यांना ही निवडणूक अधिक सोपी जाईल असे एकंदरीत चित्र दिसून येत आहे.मात्र शिवसेनेचे माजी जि.प.सदस्य संदेश कार्ले यांनी घेतलेला बंडाचा झेंडा राणीताईच्या मतांना फटका बसण्याची शक्यता आहे.**



पारनेर -नगर विधानसभा मतदारसंघात २०१९ ला नीलेश लंके यांनी विजयराव औटी यांचा पराभव केला. कोरोनात त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर दखलपात्र असे काम केले. लोकसभा निवडणुकीत डॉ.सुजय विखे पाटलांचा पराभव करत इतिहास घडवला. दरम्यान पारनेर हा विधानसभा मतदारसंघ महाविकास आघाडीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वाट्याला आला या ठिकाणी जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य राणीताई लंके यांना उमेदवारी देण्यात आली. लंके यांच्या विरोधात लोकसभेनंतर पारनेर-नगर तालुक्यातील अनेक पुढारी एकत्र झाले. विधानसभा निवडणुकीत त्यांच्या विजयाचा वारू थांबवण्यासाठी परस्परांशी असलेले मतभेद त्याचबरोबर मनभेदाचे राजकीय जोडे बाजूला सारत अनेकांनी एकमेकांच्या हातात हात घातला.

भारतीय जनता पक्षाकडूनही या मतदारसंघात निवडणुकीची तयारी करण्यात आली होती. त्यांच्याकडूनही काही उमेदवार इच्छुक होते. हा मतदारसंघ कमळ चिन्हावर निवडणूक रिंगणात उतरेल अशा प्रकारची चर्चा होती. मात्र मोठ्या पवारांच्या उमेदवाराविरोधात दादांचा शिलेदार मैदानात उतरवायचा असे धोरण महायुतीचे असल्याने पारनेरची जागा घड्याळाला गेली. आणि लागलीच या तालुक्यातील अनेक नेते थेट अजितदादांच्या भेटीला गेले. त्यामध्ये प्रामुख्याने जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील, माजी सभापती काशिनाथ दाते, माधवराव लामखडे, माजी नगराध्यक्ष विजय सदाशिव औटी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला. त्यावेळी भारतीय जनता पक्षाचे स्थानिक नेते सुद्धा त्या ठिकाणी होते. अजितदादा यांनी थेट पारनेर बाजार तळावर सभा घेत नीलेश लंके आणि पर्यायाने राणी लंके यांच्या विरोधात एकजुटीने लढाई लढा अशा प्रकारचा सल्ला दिला. त्यानंतर बरेच दिवस एका नावावर एक मत होईना. सर्वांनीच उमेदवारीसाठी या ठिकाणी दावा केला. उपमुख्यमंत्र्यांच्याकडे याबाबत बैठका झडल्या पण नेमकी उमेदवारी कोणाला याबाबतचा सस्पेन्स सुरूच होता. शेवटी काशिनाथ दाते यांच्या नावाची घोषणा अजित पवार गटाकडून करण्यात आली. असे

पारनेर दर्शन Special

असले तरी सुजित झावरे पाटील, माधवराव लामखडे, विजय सदाशिव औटी यांनी उमेदवारी अर्ज भरला.

महायुतीचा उमेदवार निश्चित कोण असणार याबाबत ४ नोव्हेंबरपर्यंत एक वाक्यता होताना दिसत नव्हती. कधी काशिनाथ दाते माघार घेणार अशा प्रकारची चर्चा होती. तर कधी सुजित झावरे पाटील किंवा विजय सदाशिव औटी उमेदवार असतील असे आडाखे बांधले जात होते. परंतु या कालावधीत खासदार नीलेश लंके हे डावपेच आखणार नाही ते लंके कसे त्यांनी विरोधकांचे हे चक्रव्यूह भेदून एक खिळखिळे करण्यामध्ये यश मिळवले. दिवाळीच्या अगोदर नगर तालुक्यातील विरोधकांच्या एकजुटीतील एक महत्त्वपूर्ण नेते माधवराव लामखडे यांना थेट बारामतीत शरद पवार यांच्याकडे घेऊन जाऊन अजित पवार गटाला मोठा धक्का दिला. लामखडे यांनी पक्षात प्रवेश केलाच त्याचबरोबर आपला उमेदवारी अर्ज सुद्धा मागे घेतला. लामखडे यांचा उमेदवारी अर्ज मागे घेताना मुख्यमंत्र्यांच्या शिवसेनेचे तालुकाप्रमुख विकास रोहोकले यांची उपस्थिती देखील खूप काही सांगून जाते.त्यामुळे महायुतीला ऐन निवडणुकीच्या तोंडावर खिंडार पाडण्यात लंके यशस्वी ठरले.

### डॉ. श्रीकांत पठारे यांचा उमेदवारी अर्ज मागे!

**उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे पारनेर तालुका प्रमुख डॉ.श्रीकांत पठारे पारनेर नगर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यास इच्छुक होते. ही जागा शिवसेनेला सुटावी यासाठी त्यांनी प्रयत्न केले. मातोश्रीला सुद्धा त्यांनी साकडे घातले. दरम्यान जागा वाटपात पारनेर -नगर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वाट्याला गेले. त्यामुळे येथे राणीताई लंके निवडणूक रिंगणात उतरल्या. तरीसुद्धा डॉ. पठारे यांनी आपला उमेदवारी अर्ज भरला. मात्र शेवटच्या दिवशी त्यांना आपला अर्ज मागे घ्यावा लागला. आघाडीचा धर्मचे आदेश पक्ष नेतृत्वाकडून आल्यानंतर त्यांनी निवडणुकीतील माघार घेतली. त्यामुळे मविआ मधील बंड बऱ्यापैकी क्षमवण्यास नगर दक्षिणच्या खासदारांना यश मिळाले. मात्र संदेश कार्ले यांचा उमेदवारी अर्ज कायम राहिला आहे. त्याचा किती परिणाम होईल हे येणाऱ्या २३ नोव्हेंबर रोजी स्पष्ट होईल.**

### काही दिवसातच एकमेकांचा हात सोडला!

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्वांनी एक उमेदवार देऊन पारनेर नगर विधानसभा मतदारसंघ अत्यंत जोमाने लढण्याचा सल्ला सर्व इच्छुक उमेदवारांना दिला होता. अन्यथा काही उपयोग होणार नाही अशी खंत सुद्धा व्यक्त केली होती. मात्र काही दिवसातच सुजित झावरे पाटील वगळता इतर नेत्यांनी काशिनाथ दाते यांची साथ सोडली. माधवराव लामखडे हे शरद पवार गटात गेले. विजय सदाशिव औटी हे निवडणूक रिंगणात कायम राहिले. त्यांनी आपला अपक्ष अर्ज मागे न घेता एक प्रकारे बंड केला. यामुळे नीलेश लंके आणि पर्यायाने राणीताई लंके यांच्या विरोधातील मतांचे विभाजन अटळ असल्याचे एकंदरीत चित्र आहे.**

## काशिनाथ दातेंच्या प्रचाराचा बुधवारी शुभारंभ

दैठणेगुंजाळ येथील खंडेश्वर मंदिरात नारळ वाढवून प्रचाराला होणार सुरूवात

दैठणे गुंजाळ : प्रतिनिधी

**दैठणे गुंजाळ येथील श्री खंडेश्वर मंदिरात नारळ वाढवून महायुतीचे पारनेर-नगर मतदारसंघातील उमेदवार काशिनाथ दाते यांच्या प्रचारचा शुभारंभ करण्यात येणार आहे.**





भारतीय जनता पक्षाचे महामंत्री तथा उत्तरप्रदेशचे राज्यसभा खासदार अनिल जैन, माजी मंत्री तथा राहुरी विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार शिवाजी कर्डिले यांच्या उपस्थितीमध्ये प्रचाराचा शुभारंभ करण्यात येणार असल्याचे दाते यांच्या संपर्क कार्यालयातून सांगण्यात आले. प्रचार शुभारंभासाठी मतदारसंघातील विविध मान्यवर उपस्थित राहणार असून त्यात ज्येष्ठ नेते सिताराम खिलारी, गंगाधर रोहोकले, भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष बाबूशेठ टायरवाले, अनिल शिंदे, विश्वनाथ कोरडे, जिल्हा परिषदेचे मा. उपाध्यक्ष सुजित झावरे, प्रशांत गायकवाड, राहुल शिंदे, विक्रम कळमकर, गणेश शेळके, बाबशेठ खिलारी, दिपक कार्ले, वसंत चेडे, सुभाष दुधाडे,सुनील थोरात,सचिन वराळ, सुभाष सासवडे, पंकज कारखिले, दवेंद्र गावडे, अमित गावडे, शरद गवते, अश्विनी थोरात, सोनाली सालके, सुषमा रावडे यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

यानिमित्त होणाऱ्या सभेनंतर महायुतीच्या प्रचाराचा धुराळा खऱ्याअर्थाने उडणार आहे. या कार्यक्रमासाठी मतदारसंघातील जनतेने मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन महायुतीच्या घटक पक्षांच्या वतीने करण्यात आले आहे.

## शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिकांचा बुधवारी मेळावा

अळकुटी येथे आयोजन | डॉ.भास्कर शिरोळे यांची माहिती

अळकुटी : प्रतिनिधी

**पारनेर-नगर मतदारसंघातील शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी तसेच शिवसैनिकांच्या मेळाव्याचे बुधवार दि.६ नोव्हेंबर रोजी दुपारी अडीच वाजता अळकुटीच्या मुक्ताई मंदिरात आयोजन करण्यात आल्याची माहिती डॉ. भास्कर शिरोळे यांनी दिली.**




संपर्क प्रमुख दादाभाऊ येणारे यांनी शिवसेना भवन येथून कळविल्याप्रमाणे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या आदेशान्वये या बैठकीचे आयोजन करण्यात आले असून महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी नीलेश लंके यांच्या प्रचाराचे नियोजन या बैठकीत करण्यात येणार आहे.

विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक जाहिर झाल्यानंतर पारनेर-नगर मतदार संघाची जागा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाला मिळावी अशी मागणी तालकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे तसेच नगर तालुक्यातील जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले यांनी केली होती. महाविकास आघाडीच्या जागा वाटपामध्ये ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसकडेच राहील्यानंतरही डॉ. श्रीकांत पठारे व संदेश कार्ले यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केले होते. उमेदवारी अर्ज माघारीच्या दिवशी डॉ. श्रीकांत पठारे यांनी उमेदवारी मागे घेतली तर संदेश पठारे यांनी हाती बंडाचा झेंडा घेत उमेदवारी कायम ठेवली.

दोघा शिवसैनिकांनी बंडखोरी केल्यानंतर निष्ठावान शिवसैनिकांनी एकत्र येत महाविकास आघाडीचा धर्म पाळण्याचा निर्धार करीत नगर व पारनेर तालुक्यातील शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांनी महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय जाहिर केला.

एकीकडे पदाधिकाऱ्यांनी बंडाची भुमिका घेतली असताना निष्ठावान पदाधिकारी तसेच शिवसैनिकांनी उध्दव ठाकरे यांचा आदेश मान्य करण्याचा निर्णय घेतल्याने बंडखोर पदाधिकाऱ्यांची पंचाईत झाली असून या पार्श्वभुमीवर होत असलेल्या या मेळाव्यात शिवसैनिक काय भुमिका मांडतात याकडे मतदारसंघातील मतदारांचे लक्ष लागले आहे.

## सुजित झावरे दातेंच्या प्रचारात सक्रिय होणार

काशिनाथ दाते, विश्वनाथ कोरडे यांनी केले स्वागत

पारनेर : प्रतिनिधी

**विधानसभा निवडणूकीसाठी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजितदादा पवार यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर जिल्हा परिषदेचे मा. उपाध्यक्ष सुजित झावरे यांनी उमेदवारी मागे घेत महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्या प्रचारात सहभागी होण्याचा निर्णय घेतला. झावरे यांच्या निर्णयानंतर उमेदवार काशिनाथ दाते व विश्वनाथ कोरडे यांनी त्यांचे स्वागत केले.**



मा. आ. स्व.वसंतराव झावरे व सुजित झावरे हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेनासून पक्षामध्ये होते. तालुक्याच्या राजकारणातील स्थित्यंतरानंतर सुजित झावरे यांनी अलिप्तपणाची भुमिका घेतली होती. काही काळ ते भाजपाच्याही संपर्कात होते.

अलिकडेच झावरे यांनी काशिनाथ दाते यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. या प्रवेशानंतर झावरे यांना राष्टवादीकडून उमेदवारी मिळेल अशी अपेक्षा होती, मात्र महायुतीमधील घटक पक्षांनी केलेल्या स्वतंत्र सर्वेक्षणात काशिनाथ दाते यांना पसंती देण्यात आल्याने झावरे उर्वरीत पान ३ वर

## शरद पवारांचे राजकारणातून संन्यास घेण्याचे संकेत!

■ किती निवडणुका लढवायच्या ? पवारांचा सवाल
■ कुठे तरी थांबले पाहिजे, नवी पिढी समोर आली पाहिजे

बारामती : प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी संसदीय राजकारणातून संन्यास घेण्याचे संकेत दिलेत. आतापर्यंत मी १४ निवडणुका लढल्या. आणखी किती लढवायच्या? कुठेतरी थांबले पाहिजे. नवी पिढी समोर यावी हे सूत्र हाती घेऊन मी आता कामाला लागलो आहे, असे ते बारामती येथे आयोजित एका प्रचारसभेत बोलताना म्हणालेत. त्यांच्या या विधानामुळे ते सक्रिय राजकारणातून संन्यास घेणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.**



शरद पवार सध्या आपले नातू तथा बारामती विधानसभा मतदारसंघातील उमेदवार युगेंद्र पवार यांच्यासाठी प्रचारसभा घेत आहेत. त्यांनी मंगळवारी एका प्रचारसभेला संबोधित करताना संसदीय राजकारणातून संन्यास घेण्याचे संकेत दिले. ते म्हणाले, मी सध्या सरकारमध्ये नाही. माझ्या राज्यसभेचे अजून दीड वर्षे शिल्लक आहेत. त्यानंतर पुन्हा राज्यसभेवर जायचे की नाही याचा मला विचार करावा लागेल. मी आता लोकसभाच नाही तर कोणतीही निवडणूक लढवणार नाही. किती निवडणुका लढवायच्या. आतापर्यंत १४ निवडणुका लढल्या. तुम्ही एकदाही घरी पाठवले नाही.

दरवेळी तुम्ही मला निवडून दिले. पण आता कुठेतरी थांबले पाहिजे. नवी पिढी समोर यावी हे सूत्र हाती घेऊन आता उर्वरीत पान ३ वर



# युवा

## ...म्हणून जुन्या काळी टिकायचे जास्त काळ !



**आज आपल्या कुटुंबात २-४ लोक आहेत, पण तेदेखील आपण सांभाळू शकत नाहीत. अशा स्थितीत घरातील कामासाठी मोलकरीण, मुलांची काळजी घेण्यासाठी बेबी सिटर आणि घरातील उर्वरित कामे करण्यासाठी नोकर ठेवत आहोत. इतकं होऊनही घरात समस्या आणि कलह सुरूच असतो. शिवाय, आजकाल नाती लवकर संपवण्याचे प्रमाणही वाढले आहे. पण जर तुम्ही विचार केलात तर लक्षात येईल की जिथे आपण अशी छोटी कुटुंबे पाहत नाहीत, तिथे पूर्वीच्या काळात २० ते २५ किंवा त्याहूनही जास्त लोक एकत्र प्रेमाने आणि कोणतीही अडचण न ठेवता कसे जगायचे ? अशा मोठ्या बदलांची कारणे आम्ही तुम्हाला सांगत आहोत...**

- संयुक्त कुटुंब फायदेशीर होते : आज बहुतेक मुले-मुली लग्नानंतर कुटुंबापासून वेगळे राहू लागले आहेत. याचे एक कारण गोपनीयता, नोकरी किंवा इतर जबाबदाऱ्या टाळणे हे असू शकते, परंतु पूर्वी असे नव्हते. कुटुंबात कितीही मुलगे किंवा सून आली तरी घरापासून विभक्त होण्याबद्दल कोणी बोलायचे नाही. याचे मुख्य कारण म्हणजे जेव्हा आपण मोठ्या कुटुंबात राहतो तेव्हा जबाबदाऱ्या आपोआप विभागल्या जातात आणि कुठेतरी जायचे असेल तर मुलांना काका-काकू, आजी-आजोबा किंवा काका-काका यांच्याकडे बिनधास्त ठेवता येत होते.
- वडिलधाऱ्यांचे न ऐकणे : पूर्वीच्या काळी कुटुंबात इतके सदस्य होते की, लग्न झालेल्या जोडप्यात घरात भांडण झाले किंवा भाऊ आपापसात भांडले तर घरातील वडीलधारी मंडळी आपसात भांडण करून मतभेद मिटवत असत. पण आज परिस्थिती अशी झाली आहे की मुले एकटे राहण्यासाठी कुटुंबापासून विभक्त होतात. त्यानंतर कुटुंबातील मोठ्यांना काही समजावून सांगायचे असले तरी त्याकडे दुर्लक्ष केले जाते. आपल्या वडिलांचे न ऐकणे हे देखील आजकाल खराब संबंधांचे एक कारण आहे.
- घटस्फोट सामान्य बाब झालाय : जर तुम्ही तुमच्या आई-वडिलांकडून किंवा काकूंकडून त्यांच्या काळाबद्दल ऐकले असेल, तर हा उल्लेख कधीतरी आलाच असेल, त्यांच्या काळात घटस्फोट असे काही नव्हते. एकदा लग्न झाले की ते पूर्ण व्हायचे . पती-पत्नीमध्ये कितीही भांडण झाले तरी एकमेकांना घटस्फोट दिला जात नव्हता. पण आज परिस्थिती अशी झाली आहे की, एखादे छोटीसे भांडण झाले की वादाची ठिणगी पेटते आणि मग प्रकरण संपुष्टात येण्यापर्यंत येते. कौटुंबिक हिंसाचार, मानसिक छळ आणि बळजबरी प्रकरणी आवाज उठवणे आणि घटस्फोट देणे योग्य आहे, परंतु निराधार कारणांसाठी नाते संपवणे चुकीचे आहे.
- संयम आणि प्रेम : आज हवं ते खाऊ न देणे, सहलीला न नेणे किंवा खरेदीसाठी न नेणे अशा छोट्या छोट्या गोष्टींवरून भांडणे सुरू होतात. पूर्वीच्या काळी असे होत नव्हते. स्त्री आणि पुरुष दोघांमध्येही संयम आणि प्रेम होते. पूर्वी लोक कोणत्याही छोट्या छोट्या गोष्टीवर रागावून बसत नसत. उलट अशा गोष्टी विसरून नातं घट्ट करण्याचा प्रयत्न करत असत. पण आजच्या लोकांमध्ये संयमाचा फारच अभाव आहे.
- कमी आनंदी रहा : माझ्याकडे मोठे घर असावे, गाडी असावी, मुलांनी खासगी शाळेत शिकावे आणि आपण देश-विदेशात फिरावे, अशी प्रत्येकाची इच्छा असते. अशा भरमसाठ इच्छा तेव्हाच पूर्ण होऊ शकतात जेव्हा उत्पन्न जास्त असेल किंवा जास्त बचत असेल. यात शो ऑफचाही एक भाग आहे. पूर्वी असं नव्हतं, त्या काळी लोकं आपल्याकडे जे आहे किंवा जे काही मिळालं आहे त्यात आनंदी असायचे आणि मनमोकळेपणाने प्रेम द्यायचे.



# तिशी गाठल्यावर स्वतःला काय विचाराल?



**एका विशिष्ट वयानंतर, आपण सर्वजण अशा परिस्थितीत पोहोचतो जिथे मागे वळून पाहणे सोपे नाही. तिशीत पोहोचल्यावर याची जाणीव प्रकर्षाने होते. म्हणूनच ३० वर्षांचे होण्याआधी, वेळेत स्वतःला काही प्रश्न विचारा. कारण या काळात आपण आपल्या जीवनातील अनेक ध्येये, मूल्ये आणि यशांचे मूल्यांकन करतो. जेणेकरून आपण कोणत्या टप्प्यावर आहोत हे आपल्याला कळू शकेल. म्हणून, हे ६ प्रश्न स्वतःला विचारा आणि शक्य असल्यास त्यांची उत्तरे डायरीत लिहा...**

### कुटुंबासाठी काय करत आहे ?

आपल्या सर्वांच्या जीवनातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपले कुटुंब, ज्यासाठी आपण काम करत आहोत आणि कमवत आहोत. पण तुम्ही जे करत आहात ते पुरेसे आहे का ? सहवास, पैसा आणि अन्न या आपल्या सामान्य गरजा आहेत, परंतु कुटुंब वेळ, प्रेम आणि सहवासाची मागणी करतात. स्वतःला विचारा, मी माझ्या कुटुंबासाठी काय करत आहे ? मी त्यांना वेळ देऊ शकतो का ? इत्यादी. जेव्हा तुम्हाला उत्तर मिळेल तेव्हा निश्चितपणे त्याचे मूल्यमापन करा.

- मी किती शिकलो ? : दिवसभर, आठवडाभर किंवा महिनाभर आपण काहीतरी नवीन शिकतो आणि काहीतरी विसरतो. अशा परिस्थितीत गेल्या काही वर्षांत तुम्ही नवीन काय शिकलात ? तुम्ही जे शिकलात ते तुम्ही किती अंमलात आणले किंवा कोणाला काही नवीन शिकवले हे प्रश्न स्वतःला विचारा आणि उत्तरे डायरीत लिहा. एक-दोन वर्षांनी जेव्हा तुम्ही ते वाचाल तेव्हा तुमच्या लक्षात येईल की तुम्ही किती शिकलात आणि असे काय होते जे तुम्हाला शिकायचे होते पण शिकता आले नाही.
- काय साध्य झाले किंवा करायचे बाकी आहे ? : दुसरा प्रश्न स्वतःला विचारायचा आहे की, तुम्ही आतापर्यंत काय साध्य केले आहे ? तुम्हाला जे वाटले होते ते तुम्ही साध्य केले का किंवा ज्या गोष्टी तुम्ही कधीच शक्य नव्हत्या तरीही त्या साध्य केल्या ? सर्व लक्ष्य साध्य झाले की नाही आदी... ३० व्या वर्षाच्या टप्प्यावर असतो तेव्हा आपण बऱ्यापैकी नोकरीत सेटल झालेलो असतो आणि अशावेळी लग्नाचीही घाई करतो. काहींचे योग्य वयातच लग्न झालेले असते.
- पुढील ५ वर्षात माझे भविष्य ? : ३० वर्षांचे वय हा मध्यम टप्पा आहे, ज्यामध्ये आपण प्रौढ नाही. अशा परिस्थितीत आपल्या भविष्याचा विचार करा, भविष्यात काय होईल ? आम्ही कुठे असू ? तुम्ही आणखी काय करत असाल ? ते आपल्या हातात नाही, पण ते कुठल्यातरी दिशेने नेणे आपल्या हातात नक्कीच आहे. म्हणूनच, पुढील ५ वर्षांमध्ये तुम्हाला स्वतःला कुठे आणि कोणत्या टप्प्यावर पहायचे आहे हे शोधण्यासाठी आताच कठोर परिश्रम सुरू करा.



### मी आनंदी आहे का ?

या एका प्रश्नाचे उत्तर तुम्हाला आयुष्यात कुठे उभे आहे हे समजण्यास मदत करेल. पण हेदेखील लक्षात ठेवणे आवश्यक आहे की जीवन हा एक प्रवास आहे. त्याच्या मार्गात तुम्हाला अनेक चढउतारांना सामोरे जावे लागेल. जर तुम्ही तुमच्या ध्येयांवर लक्ष केंद्रित केले आणि कठोर परिश्रम केले तर तुम्हाला यश नक्कीच मिळेल आणि यश आणि आनंद तुमच्या पायांचे चुंबन घेईल.

- पुढे जाण्यापासून काय रोखत आहे ? : जेव्हा आपण आयुष्यात पुढे जात असतो तेव्हा प्रत्येक कंपनी किंवा प्रत्येक संस्था आपल्याला पुढे घेऊन जाईलच हे आवश्यक नसते. काही वेळा अशा काही गोष्टी असतात ज्या आपल्याला पुढे जाण्यापासून थांबवतात आणि आपली वाढ खुंटतात. अशा परिस्थितीत, ज्या गोष्टी तुम्हाला पुढे जाण्यापासून रोखत आहेत त्यांचा विचार करणे आणि त्या सोडण्याचा किंवा त्या सुधारण्याचा प्रयत्न करणे महत्वाचे आहे.



# जोडीदाराकडून या गोष्टी मागाव्या लागत असतील तर नातं आजच संपवा!

**आजच्या काळात कोणतंही नातं टिकवण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतात. नाहीतर ते नातं कधी कमकुवत व्हायला लागतं आणि कधी संपण्याच्या मार्गावर येऊन ठेपतं हेही कळत नाही. तथापि, आपण आपले नाते जपण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न केले पाहिजेत. परंतु जर तुमचे नाते अशा टप्प्यावर पोहोचले असेल की तुम्हाला वेळ आणि आदर यासारख्या छोट्या गोष्टींची मागणी करावी लागत असेल तर तुम्ही नाते संपवण्यासाठी पावले उचलली पाहिजेत...**

- वेळ मागावा लागतोय ? : अनेकदा असे दिसून येते की कोणत्याही नात्याच्या सुरुवातीला लोक आपल्या जोडीदारावर खूप प्रेम करतात आणि आपला सर्व वेळ देतात. घरात असो की बाहेर एकमेकांसाठी वेळ काढल्याने नाती मजबूत होतात आणि सुधारतात. पण जर तुम्हाला तुमच्या जोडीदाराकडून स्वतःसाठी वारंवार वेळ मागावा लागत असेल, तर तुमची किंमत समजून घ्या आणि नाते संपवा.
- लक्ष देत नाही ? : जर तुमचा जोडीदार तुमच्याकडे लक्ष देत नसेल तर त्याने लक्ष द्यावे म्हणून तुम्हाला प्रयत्न करावे लागत असतील तर तुमच्या नात्यातील कमकुवतपणा दर्शवते. हे वारंवार घडत असेल तर धोक्याची घंटा आहे. स्वतःचे आणि वेळेचे महत्त्व समजून एकदा जोडीदाराशी बोला. जर तो अजूनही समजत नसेल तर संबंध संपवणे योग्य आहे.
- सन्मान मागावा लागतो ? : कोणत्याही नात्याचा पाया हा परस्पर आदर असतो आणि जर तुम्हाला तुमच्या जोडीदाराला तुमचा आदर करायला सांगावे लागत असेल तर आजच्या शब्दात सांगायचे तर तो मोठा लाल झेंडा आहे. अशा रिलेशनशिपमध्ये राहू नका. ज्यामध्ये तुम्हाला तुमच्या पार्टनरला तुमचा आदर करण्यास सांगावे लागेल.
- वचनबद्धता नसणे : दोन्ही बाजूंनी दृढ वचनबद्धता गरजेची असते. ती पूर्ण होते तेव्हाच कोणतेही नाते पुढे जाते. परंतु जर तुमचा सोबती दृढ वचनबद्धतेपासून मागे राहत असेल किंवा असे करण्यास घाबरत असेल, तर तिला तिच्या भावनांबद्दल खात्री नाही. म्हणून अशा व्यक्तीशी संबंध ठेवू नका.
- एकनिष्ठ राहण्यासाठी विचारावे : जेव्हा तुम्ही नातेसंबंधात असता तेव्हा तुमच्या जोडीदाराशी एकनिष्ठ राहणे सर्वात महत्त्वाचे



असते. कुणालाही असाच जोडीदार हवा असतो. त्यामुळे प्रामाणिक राहा. पण तुमच्या विश्वासाला महत्त्व नसलेल्या किंवा तुमच्याशी एकनिष्ठ नसलेल्या नात्यात असण्याची भीती बाळगू नका. जर तुम्हाला तुमच्या जोडीदाराला एकनिष्ठ राहण्यास सांगावे लागत असेल तर हे नाते पुढे नेणे योग्य नाही.

# जोडीदाराशी जवळीक वाढवणारे ५ प्रश्न!

**तुमचे प्रेमाचं किंवा लग्नाचं नातं घट्ट होण्यासाठी तुम्ही काय करता ? जर तुमचे उत्तर काहीच नाही, फक्त एकत्र राहता, फिरता असं असेल तर तुम्ही दोघे एकमेकांच्या तितके जवळ नसाल जितके तुम्ही असायला पाहिजेत. तुमच्या जोडीदाराशी जवळीक आणि तुमच्या नात्यात ताकद तेव्हा येते जेव्हा तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत काहीतरी नवीन करण्याचा प्रयत्न करता. तुमच्या जोडीदाराला चांगले ओळखण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे समोरासमोर संवाद आणि प्रश्न विचारणे. तुमच्या जोडीदाराला काय विचारायचे या संभ्रमात असाल तर तुम्ही आम्ही दिलेले ५ प्रश्न करून पाहा. हे ५ प्रश्न तुम्हाला तुमच्या जोडीदाराला जाणून घेण्यास मदत करतील आणि तुम्हाला एकमेकांच्या जवळ आणतील...**



- पहिला प्रश्न : तुमच्या जोडीदाराशी बोलत असताना तिला विचारा की, अशी कोणती गोष्ट होती जी तुला अजूनही त्रास देत आहे ? तुमचा हा प्रश्न तुम्हाला तुमच्या जोडीदाराच्या वेदनांची कल्पना तर देईलच पण तुमच्या शब्दांचा योग्य वापर करण्यासही मदत करेल. याशिवाय मनातील बोलण्याने तुमच्या जोडीदाराचे मनही हलके होईल.
- दुसरा प्रश्न : आणखी एक प्रश्न तुम्ही तुमच्या जोडीदाराला विचारू शकता, तुझ्याबद्दल अशी कोणती गोष्ट आहे जी मला समजत नाही किंवा समजणे कठीण आहे ? प्रत्येक नात्याला चांगले स्थान देण्यासाठी हा प्रश्न विचारणे खूप महत्त्वाचे आहे. कधीकधी परिस्थिती अशी बनते की आपण आपल्या जोडीदाराबद्दल गैरसमज करून घेतो किंवा तिच्या बोलण्याकडे अनावश्यक समजून दुर्लक्ष करतो. अशा परिस्थितीत, तिला हा प्रश्न विचारा आणि गोष्टी स्पष्ट करा.
- तिसरा प्रश्न : हा एक प्रश्न आहे जो तुमच्या नात्याला योग्य मार्गावर नेऊ शकतो. तुमच्या जोडीदाराला हा प्रश्न विचारा, आपल्या नात्यात तुला सर्वात जास्त कशाची भीती वाटते ? जेव्हा तुम्ही तुमच्या जोडीदाराला हा विचारता तेव्हा तिचे लक्षपूर्वक ऐका, ते तुम्हाला तुमचे नाते जतन करण्यासाठी भविष्यात आवश्यक पाऊल उचलण्यास मदत करेल.
- चौथा प्रश्न : प्रत्येक मुलगा किंवा मुलीला आपल्या जोडीदाराकडून ऐकावेसे वाटणारे वाक्य म्हणजे माझ्यात इतरांपेक्षा वेगळे काय आहे ? वचनबद्ध होण्यापूर्वी, आपण अनेकांना डेट करतो किंवा चाचणी करतो पण फक्त एकाच व्यक्तीसोबत नातं पुढे जाते. कारण आपल्या जीवनसाथीमध्ये आपल्याला हवे असलेले सर्व गुण आपल्याला तिच्यामध्ये दिसतात. विशेषतः जेव्हा तुम्ही जोडीदाराला हा प्रश्न कराल तेव्हा तिला मनापासून आनंद होतो की तुम्ही तिची स्तुती करत आहात.
- पाचवा प्रश्न : तुम्ही तुमच्या जोडीदाराला दर सहा महिन्यांनी किंवा वर्षातून एक प्रश्न विचारला पाहिजे, जर तू आपल्या नात्यातील एक गोष्ट बदलू इच्छित आहे तर ती काय असेल ? हा एक असा प्रश्न आहे जो तुमचं नातं मजबूत करेलच, पण तुमच्या चुका सुधारण्याची संधीही देईल. त्यामुळे या प्रश्नांची उत्तरे आज किंवा या आठवड्यात तुमच्या जोडीदारालाही विचारायला हवीत आणि एकमेकांची जवळीक वाढवावी.

## शॉर्ट न्यूज

### मतदार जनजागृतीत सामाजिक संघटनांनी सहभागी व्हावे

**कोपरगांव :** विधानसभा निवडणुकीत विविध सामाजिक संघटना, संस्था यांचा सहभाग महत्त्वाचा असून राष्ट्रीय कर्तव्य भावनेने मतदारांना जागृत करण्याचे आवाहन कोपरगाव विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी सायली सोळंके यांनी केले. कोपरगांव विधानसभा मतदारसंघात मतदारांमध्ये व्यापक जनजागृती मोहीम राबविली जात आहे. याचाच एक भाग म्हणून रोटरी क्लब ऑफ कोपरगाव सेन्ट्रलच्यावतीने मतदार जागृतीविषयी घोषवाक्य असलेल्या भित्तीपत्रकाचे अनावरण करण्यात आले. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या.

### नेवासा विधानसभा मतदारसंघात तिरंगी लढत

**नेवासा :** विधानसभा मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज भरलेल्या २४ पैकी १२ उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने १२ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. महाविकास आघाडीचा घटक पक्ष असलेल्या उबाठा शिवसेना कडून आ. शंकरराव गडाख, शिवसेना शिंदे गटाकडून विठ्ठलराव लंघे व प्रहार जनशक्ती पक्षाचे बाळासाहेब मुरकुटे अशी तिरंगी लढत होणार आहे. अर्ज माघारी घेण्याची मुदत संपल्यानंतर कोणकोणामध्ये लढत होणार हे स्पष्ट झालं आहे. नेवासा विधानसभा मतदार संघातून १२ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत.

### नगर शहर मतदारसंघात १४ उमेदवार रिंगणात

**नगर :** शहर मतदारसंघातून महाविकास आघाडीचे बंडखोर उमेदवार माजी महापौर भगवान फुलसौंदर, माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे, काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले. तसेच अपक्ष उमेदवार माजी उपमहापौर सुवर्णा कोतकर यांनीही माघार घेतल्याचे समजतेय. आता महायुतीचे आमदार संग्राम जगताप आणि महाविकास आघाडीचे माजी महापौर अभिषेक कळमकर आणि शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अपक्ष उमेदवार शशिकांत गाडे यांच्यात व इतर उमेदवारांमध्ये सरळ लढत होणार असून २४ पैकी १० जणांनी माघार घेतल्याने एकूण १४ उमेदवार रिंगणात उरले आहेत.

### राहुल धस यांना केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक

**शेवगाव :** केंद्रीय गृहमंत्रालयातर्फे देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्मृतिप्रित्यर्थ देण्यात येणारे केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक यंदा एरंडगाव येथील रहिवासी व सध्या फलटण येथे कार्यरत असलेले उपविभागीय पोलिस अधिकारी राहुल धस यांना जाहीर करण्यात आले. या पदकासाठी विविध गुन्ह्यांच्या तपासकामी राज्यात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या ११ पोलिस अधिकाऱ्यांची त्यासाठी निवड करण्यात आली आहे.

### राहुल धस यांना केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक

**संगमनेर :** तालुक्यातील आश्वी बुद्रुक येथील प्रगतशील शेतकरी विठ्ठल मुरलीधर खेमनर (वय ६५) आणि माजी ग्रा. पंसदस्य जाखोबा राणु पिलगर (वय ५५) या दोघांचा नगर-मनमाड महामार्गावर शिंगवे नाईक शिवारात झालेल्या भिषण अपघातात मृत्यू झाला आहे. त्यामुळे आश्वीसह पंचक्रोशीत शोककळा पसरली आहे. कंटेनर आणि त्यांच्या दुचाकीचा भिषण अपघात झाला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरीक घटनास्थळी धाव घेतली आणि अहिल्यानगर येथील रुग्णालयात दोघांनाही उपचारासाठी दाखल केले. मात्र उपचारापूर्वीच दोघांचा मृत्यू झाला.

# तुम्ही फक्त परिवर्तन करा ; रोजगाराची जबाबदारी मी घेतो!



**संगमनेर : प्रतिनिधी**

**शिर्डी मतदार संघाप्रमाणेच संगमनेरचा विकास आपल्याला करायचा आहे. तुम्ही फक्त परिवर्तन करा. या तालुक्यातील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी मी घेतो. आमच्यावर दहशतीचा आरोप करता, तर मग अमृतवाहिनी बँकेची शाखा राहात्यात काढावीशी का वाटते? असा सवाल महसूल तथा पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी उपस्थित केला.**

महायुतीचे उमेदवार अमोल खताळ यांच्या निवडणूक प्रचाराचा शुभारंभ मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आला. या निमित्ताने समनापूर गणपती मंदिरापासून युवकांची भव्य रॅली काढण्यात आली. महायुतीचा जयघोष करीत शहरातील प्रमुख रस्त्यावरुन काढण्यात आलेल्या या रॅलीचे जोरदार स्वागत करण्यात आले. त्यानंतर आयोजित केलेल्या जाहिर सभेत मंत्री विखे पाटील यांनी थोरातांच्या निष्क्रियेतेवर बोट ठेवून त्यांनी केलेल्या आरोपांचा कडक शब्दांत समाचार घेतला.

मंत्री विखे पाटील म्हणाले, की शिर्डीत दहशत असती, तर संगमनेरच्या मालपाणी परिवाराला वॉटरपार्कचा प्रकल्प उभारावा वाटला असता का? या तालुक्यातील आमदारांचे बंधू आमच्या तालुक्यात येवून २० कोटी रुपयांहून अधिक रकमेचे शासकीय कामे करतात तेव्हा त्यांना दहशत वाटली नाही का? राहाता पंचायत समितीचे १२ कोटी रुपयांचे काम संगमनेर साखर कारखान्याचे चेअरमन बाबा ओहोळ यांच्या भावाने केले त्यांना विचारा तेथे दहशत होती का? दहशत असती तर आमदार थोरातांना सुध्दा राहात्यामध्ये अमृतवाहिनी बँकेची शाखा काढावीशी वाटली असती का? असा प्रश्न उपस्थित करुन खरी दहशत तर तुमच्या तालुक्यात आहे. वर्गात जावून प्राध्यापकांना मारण्याची संस्कृती आमची नाही. स्वता:ला सुसंस्कृत म्हणवून घेता तर धांदरफळ सभेनंतर महिलांवर केलेल्या हल्ल्याच्या बाबत माफी मागण्याची दानत तुमची नाही. तुम्ही काहीच केले नाही तर आरोपींना लपवून का ठेवता याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

या तालुक्यातील कारखाना पद्मश्री विखे पाटील, बी.जे.खताळ पाटील, भास्करराव दुर्वे, दत्ता देशमुख यांच्या प्रयत्नांमुळे उभा राहिला पण याची साधी तुम्हाला आठवणही राहिली नाही. वर्षानुवर्षे केवळ स्वता:च्या मक्तेदाऱ्या तयार करुन माफिया निर्माण केले. पाण्यासाठी लोकांना झुंजत ठेवले. या तालुक्यातील युवक रोजगार मागत आहेत. पण तोही तुम्ही त्यांना दिला नाही. कोणता विकास तुम्ही केला. जोर्वे गावात तुमच्या घराकडे जाणारा रस्तासुद्धा मलाच करुन द्यावा लागला. असा टोला लगावून या तालुक्यात परिवर्तन आता अटळ आहे. तुमच्या पापाचा घडा आता भरला आहे. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना हे काँग्रेसचे नेते बंद करायला निघाले होते. बहिणींच्या अन्नात माती कालवणाऱ्या या महाभकास आघाडीच्या नेत्यांना आता दारातही उभे करुन नका असे सांगून लाडक्या बहिणीच आता तुमची जागा तुम्हाला दाखवून देणार असल्याचे सांगितले.

अनेक वर्षे महसूल मंत्री म्हणून मिरवलात. जिरायती पट्टयातील युवकांसाठी औद्योगिक वसाहत तुम्ही निर्माण करु शकला नाही. आता ही वसाहत आम्ही निर्माण करुन दाखवू असे विश्वासीत करुन या तालुक्यात फक्त जमिन खरेदी विक्री करणारे एजंट तयार झाले. बोगस खरेदी केल्या गेल्या. कऱ्हे आणि चिकणी गावातील वनजमीनी हडप केल्या गेल्या या सर्वांची चौकशी आता सुरु झाली आहे. महायुती सरकारने दोन वर्षात ६०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. वेगवेगळ्या योजनांमधून पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले आहे.

महाविकास आघाडीच्या काळात असे कधी घडले नव्हते. राज्यात महायुतीचा जनाधार आता वाढत चालला आहे. संगमनेर तालुक्यातही महायुतीचे उमेदवार अमोल खताळ यांच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभे राहून परिवर्तन घडवा असे आवाहन मंत्री विखे पाटील यांनी केले. याप्रसंगी भाजपाचे वैभव लांडगे, श्रीराम गणपुले, शिवसेनेचे रामभाऊ रहाणे, उमेदवार अमोल खताळ यांची भाषणे झाली. या सभेस तालुक्यातील महायुतीचे कार्यकर्ते व पदाधिकारी व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुण्यातील २१ जागांवर महायुतीच जिंकणार

**महाराष्ट्रातही भाजप महायुतीला मोठे यश मिळेल पंकजा मुंडेंनी व्यक्त केला विश्वास**

**पुणे : प्रतिनिधी**



**आगामी विधानसभेच्या पार्श्वभूमीवर सध्या राज्याच्या राजकीय वर्तुळात मोठ्या घडामोडी घडत आहेत. अशात भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी पुण्याच्या दौऱ्यावर माध्यमांशी संवाद देखील साधला आहे. यावेळी त्यांनी पुण्यात सद्यस्थितीत २१ मतदारसंघांपैकी १८ जागा महायुतीकडे आहेत. मात्र यावेळी २१ पैकी २१ जागा महायुतीकडे ठेवायच्या आहेत, असा विश्वास व्यक्त केला आहे.**

पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, आम्ही सर्वजण विधानसभा निवडणुकीसाठी कंबर कसून कामाला लागलो आहोत. सद्यस्थितीत पुणे जिल्ह्यातील २१ मतदारसंघांपैकी १८ जागा महायुतीकडे आहेत. मात्र, यावेळी २१ पैकी २१ जागा महायुतीकडे ठेवायच्या आहेत, लोकसभा निवडणुकीत आम्हाला थोडेसे यश कमी मिळाले आहे. मात्र, विधानसभेला २१ जागांवर यश मिळेल, असा विश्वास त्यांनी कार्यकर्त्यांसमोर बोलून दाखवला आहे.

लोकसभा निवडणुकीबद्दल बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या, हरियाणाच्या निवडणुकीत भाजपला मोठे यश मिळाले आहे, आता महाराष्ट्रातही भाजप महायुतीला मोठे यश मिळेल. त्यानुसार, पुण्यातील ८ च्या ८ जागा आम्ही जिंकणार असेही पंकजा यांनी म्हटले. एखादा निर्णय होत नाही, तोपर्यंत मागणी करू शकतात, तो भाजप कार्यकर्त्यांचा डीएनए आहे. मात्र, निर्णय झाल्यावर ते पक्षासोबत असतात.

दरम्यान, सध्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेक नेत्यांनी बंडखोरी देखील केली आहे. त्यामुळे याचा फटका महायुती तसेच महाविकास आघाडीला देखील काही प्रमाणात बसणार आहे. अनेक ठिकाणी भाजपला धक्का बसत आहे. बीडच्या केज विधानसभा मतदारसंघात देखील भाजपच्या माजी आमदार संगीता ठोंबरे यांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी अर्ज भरला होता. मात्र त्यांनी तो मागे घेतला असून आता शरद पवार गटाला पाठिंबा त्यांनी जाहीर केला आहे. त्यामुळे या मतदारसंघात भाजपला मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

# अपहृत उमेदवाराची पोलिसांकडून सुटका

**स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाची कारवाई**

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर येथील पश्चिम मतदार संघामधून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या अपहृत उमेदवाराची सुटका नारेगाव चिखलठाणा परिसरातून अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सुटका केली आहे.**




राजु धर्माजी शिंदे, (वय ४९, रा.करोडी, ता.जि.छत्रपती संभाजीनगर) असे अपहृत झालेल्या उमेदवाराचे नाव आहे. याबाबत मंगेश काशिनाथ जाधव, (वय २९, रा.करोडी, ता.जि.छत्रपती संभाजीनगर) यांनी याबाबत फिर्याद दिली होती. फिर्यादीत म्हटले केली, विधानसभेसाठी छत्रपती संभाजीनगर (पश्चिम) मतदार संघातून राजू शिंदे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यानतर ते नातेवाईकांसोबत शिर्डी येथे देवदर्शनाकरीता आले होते. रविवार (दि.३ ) रोजी दुपारी साडेतीन वाजता शिर्डीहून नाशिककडे जात असताना संगमनेर तालुक्यातील समनापूर येथे चारचाकी वाहनातून ८ ते १० अनोळखी व्यक्तीने राजू धर्माजी शिंदे यांना तु उमेदवारी अर्ज मागे घेणार आहे, की नाही असे विचारून त्यांना, तसेच त्यांची पत्नी चंद्रकला राजू शिंदे, बहीण ताराबाई किशोर तुपे व दाजी किशोर तुपेर यांना पळवून नेल्याचे फिर्यादीत म्हटले होते. याबाबत शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना मिळालेल्या माहितीनुसार राजू शिंदे हा नारेगाव चिकलठाणा परिसरात असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्या नुसार पथकाने सापळा रचून अपहृत व्यक्तीला ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली असता अपहरण झाले नसल्याचे त्यांनी पोलीस जबाबात सांगितले.

# अपक्ष उमेदवाराचा निवडणूक अधिकाऱ्याच्या गाडीवर हल्ला

**पिंपरी चिंचवड पोलिसांनी घेतले ताब्यात**

**पुणे : प्रतिनिधी**

**विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांनीही आपल्या प्रचाराला जोरदार सुरुवात केली असतानाच एक धक्कादायक बातमी घडली आहे. एका अपक्ष उमेदवाराने निवडणूक अधिकाऱ्याची गाडी पेटवून दिली आहे. याप्रकरणी पोलिसांनी अपक्ष उमेदवाराला ताब्यात घेतलं आहे. या घटनेमुळे खळबळ माजली आहे.**



पुण्याच्या पिंपरी चिंचवडमध्ये हा सगळा धक्कादायक प्रकार घडला आहे. दृष्टिहीन उमेदवार विनायक ओव्हाळ यांनी शासकीय कार्यालयात विधानसभेचे निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांची गाडी पेटवण्याचा प्रयत्न केला आहे. काळेवाडी पोलिसांनी याप्रकरणी विनायक ओव्हाळ यांना ताब्यात घेतलं आहे. वेळीच आग नियंत्रणात आणण्यात आल्यामुळे मोठी दुर्घटना टळली.पोलिसांनी ही आग आटोक्यात आणली.

या घटनेत निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांच्या गाडीचे नुकसान झाले आहे. ओव्हाळ यांनी गाडी पेटवून देण्याचा प्रयत्न का केला, याची चौकशी पोलिसांकडून सुरू आहे. उमेदवारी अर्जाबाबत दोघांमध्ये काही वाद झाला होता का, याबाबत पिंपरी चिंचवडमध्ये चर्चा सुरू आहे. वारंवार पाठपुरावा करून ही रमाई आवास योजनेत घर मिळालं नाही, रसवंती आणि फटाका स्टॉल लावण्यास परवानगी दिली नाही. तसेच पालिकेच्या थेरगाव रुग्णालयात कॅन्टीनला लावण्याची परवानगी दिली नाही, यामुळं ओव्हाळ यांनी गाडी पेटवून दिल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली आहे.

या घटनेत विनायक ओव्हाळ यांच्यासोबत नागेश काळे आणि अजय गायकवाड हे आणखी दोघे उपस्थित होते. काळे सुद्धा दिव्यांग असून त्यांच्याच रिक्षातून ओव्हाळ हे या प्रभागात आले होते. त्याचवेळी हा सगळा धक्कादायक प्रकार घडला.


दरम्यान, चिंचवड विधानसभा मतदारसंघात उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी अपक्ष नाना काटे यांच्यासह फक्त सात उमेदवारांनी माघार घेतली आहे. त्यामुळे आता महायुतीचे शंकर जगताप, महाविकास आघाडीचे राहुल कलाटे आणि अपक्ष भाऊसाहेब भोईर यांच्यात प्रमुख लढत होणार आहे.

## वाचकांच्या लेखणीतून

# अभिजात व्यक्तीमत्व हरपले!

ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञ, पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार मंडळाचे अध्यक्ष आणि नीती आयोगाचे सदस्य डॉ. बिबेक देबरॉय यांचे गेल्या शुक्रवारी दिल्ली येथील एम्स रुग्णालयात निधन झाले. ते पोटाच्या विकाराने त्रस्त होते . ते ६९ वर्षांचे होते.

त्यांचे प्रारंभिक शिक्षण को नरेंद्रपूरातील रामकृष्ण मि झाले. उच्च शिक्षण प्रेसिडे (कोलकाता), दिल्ली स्कूल इकॉनॉमिक्स आणि ट्रिनिटी (केम्ब्रीज) येथे झाले होते.



वित्तीय धोरणाच्या परिघाबाहेर कोणतेही क्षेत्र असू नये. असे ते आग्रही प्रतिपादन करीत. बड्या शेतकऱ्यांनी करसवलतींचा दुरूपयोग करून करचुकवेगिरी केली आहे असे त्यांचे मत होते. यावरून ते टीकेचे धनीही झाले होते.

अर्थशास्त्रीय लेखन तर त्यांनी केलेच. पण ते संस्कृत भाषेचेही विद्वान असल्याने चार वेद, उपनिषदे, भागवत पुराण (३ खंड), रामायण (३ खंड) आणि महाभारत (१० खंड), भगवद्गीता, हरिवंश आदी संस्कृत ग्रंथांचे त्यांनी इंग्रजी भाषेत अनुवादही केलेले आहेत.

त्यांचे वक्तृत्व सुश्राव्य असून त्यांचे इंग्रजी आणि संस्कृत उच्चारण खणखणीत आणि सुबोध असे. रामायणातील मा निषाद... आणि भगवद्गीतेतील धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे... हे श्लोक (प्रत्येक चरणातील आठ अक्षरांच्या) अनुष्टुभ छंदातील आहेत. हे ून सांगत तेव्हा श्रोत्यांचे विना राहत नसत! देव यांच्या गीत गोविंद ी ते लीलया म्हणून ोतेजन तल्लीन होत! पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

डॉ. बिबेक देबरॉय एक प्रखर विद्वान होते. ते अर्थशास्त्र, इतिहास, संस्कृती, राजनीती, अध्यात्म आणि अन्य विविध क्षेत्रांमध्ये पारंगत होते. असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपले मत व्यक्त केले आहे.

डॉ. बिबेक देबरॉय यांच्या रूपाने एक भारतीय अभिजात व्यक्तीमत्व हरपले आहे. त्यांना हीच श्रध्दांजली समजूया.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,जि. अहमदनगर.**

(पान १ वरून)

## सुजित झावरे दातेंच्या प्रचारात सक्रिय होणार

यंच्याऐवजी दाते यांना उमेदवारी देण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

झावरे यांचा तालुक्यात कार्यकर्त्यांचा मोठा संच असून त्यांची भुमिका निर्णायक ठरणार आहे. त्यामुळेच अजित पवार यांनी सुजित झावरे याच्यांशी चर्चा करून अपक्ष उमेदवारी अर्ज मागे घेण्यास सांगितले तसेच पक्षाचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्या प्रचारात सक्रीय होण्याच्या सुचना दिल्या होत्या. अजित पवार यांच्या सुचनेनुसार काशिनाथ दाते तसेच महायुतीच्या घटक पक्षाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये बैठक होऊन झावरे यांनी दाते यांच्या प्रचारात सक्रीय होण्याचा निर्णय घेतला. काशिनाथ दाते, विश्वनाथ कोरडे यांनी त्यांचे स्वागत केले.

## शरद पवारांचे राजकारणातून संन्यास घेण्याचे संकेत!

मी कामाला लागलो आहे. पण याचा अर्थ मी समाजकारण सोडले असा नाही. सत्ता नको, पण लोकांची सेवा, लोकांचे काम करतच राहायचे. ज्या भागात दलित, भटके विमुक्त, उपेक्षित या वर्गासाठी काही करता येईल ते करायचे हा माझा स्वतःचा निर्णय आहे. आता आपल्याला निवडूक नको हे मी ठरवले आहे. पण असे असले तरी राज्य व्यवस्थित चालावे यासाठी नवी पिढी तयार करायला पाहिजे.

मी ३० वर्षांपूर्वी लोकसभा न लढवण्याचा निर्णय घेतला. कारण,३०-३५ वर्षे सतत निवडून गेल्यानंतर नवी पिढी तयार करण्याची गरज असते. त्यानुसार मी इथली सर्व जबाबदारी अजित पवारांकडे सोपवली. मागील २५-३० वर्षांपासून ही जबाबदारी त्यांच्यावर आहे. पहिली ३० वर्षे माझ्यावर आणि त्यानंतरची ३० वर्षे अजित पवारांवर. आता पुढल्या ३० वर्षांची व्यवस्था करण्याची गरज आहे. ती करायची असेल तर लोकांमध्ये जाऊन त्यांचे प्रश्न समजून घेऊन त्यात लक्ष घालण्याची दृष्टी हवी, असे म्हणत शरद पवार यांनी यावेळी बारामतीची सर्व सूत्रे युगेंद्र पवार यांच्या हातात सोपवल्याचे सप्ष्ट केले.

# शहर विकासाचे स्वप्न पुर्ण होतेय ! - आ. संग्राम जगताप

## स्टेशन रोड, आगरकर मळा, आनंदनगर परिसरात विकास यात्रा

**नगर : प्रतिनिधी**

**नगर शहरातील विविध विकास कामे माग लावण्यात गेल्या दहा वर्षात मोठया प्रमाणावर यश आले असून नगर शहर विकासाचे स्वप्न पुर्ण होत असल्याचा आनंद आहे असे प्रतिपादन महायुतीचे उमेदवार आ. संग्राम जगताप यांनी केले.**



शिवसेना ठाकरे गटाच्या महिला पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी अजित पवार गटामध्ये प्रवेश केला. आ. संग्राम जगताप यांनी त्यांचे स्वागत केले.

नगर शहर विधानसभा मतदारसंघातील स्टेशन रोड, आगरकर मळा, आनंदनगर परिसरात आ. संग्राम जगतात यांच्या प्रचारार्थ विकास यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी आ. जगताप यांनी नागरीकांशी संवाद साधला. शहरामध्ये झालेल्या विकास कामांमुळे विविध प्रभागांमध्ये या विकास यात्रेचे जल्लोषात स्वागत होत असल्याचे नमुद करून यावेळी बोलताना आ. जगताप म्हणाले, मतदारांचा मतरूपी आशीर्वाद घेण्यासाठी विविध प्रभागांमध्ये फिरत असताना नागरीकांमध्ये उत्साह दिसून येतो आहे. गेल्या दहा वर्षात नियोजनबध्द व कायमस्वरूपीविकास कामे माग लावण्यात आपणास यश आले आहे.

आ. जगताप पुढे म्हणाले, स्टेशन रोड परिसरातील काटवण खंडोबा रस्ता कॉंक्रीटीकरण कामासाठी मोठा निधी उपलब्ध करून देण्यात आला. आगरकर मळयातील ओढयावरील पुलाचे कामही पुर्ण झाले आहे. लवकरच रस्त्यांचे कामही पुर्ण होऊन स्टेशन रोड परिसरातील नागरीकांना दळणवळणासाठी जवळचा मार्ग उपलब्ध होणार असल्याचे जगताप म्हणाले.

यावेळी माजी नगरसेवक विजय गव्हाळे, संभाजी पवार, सुनील काळे, भैयया कांबळे, दत्ता खैरे, चंद्रकांत औशीकर, सतीश खैरे, दत्ता गाडळकर, अनिकेत आगरकर,बाळासाहेब ठुबे, अरूण नाणेकर,हेमंत थोरात, प्रमोद कुलकण, राजू जाधव, दीपक लोंढे, शरद दळवी, सोमनाथ रोकडे, बंटी जाधव आदी उपस्थित होते.

### विकासाचा अजेंडा

रेल्वे स्टेशन सीना नदीवरील पुलाचे काम माग लावण्यात यश आले असून या भागातील अंतर्गत पिण्याच्या पाण्याच्या लाईन, ड्रेनेज, रस्ते, पथदिवे, व ज्येष्ठ नागरीकांचे प्रश्न सोडविण्याचे काम करण्यात आले आहे.सर्वांना बरोबर घेऊन शहर विकासाचे पाहिलेले स्वप्न पुर्ण होताना दिसत आहे. स्टेशन रोड परिसरातील नागरीकांनी दिलेल्या आशीर्वादामुळे मन भारावून गेले असून मी विकासाच्या अजेंडयावरच निवडणूक लढवित आहे.

आ. संग्राम जगताप

### आ. जगतापांनी नागरीकांचा विश्वास संपादन केला

स्टेशन रोडपरिसराच्या विकास कामांसाठी आमदार संग्राम जगताप यांनी मोठा निधी उपलब्ध करून दिला. त्या माध्यमातून विविध विकास कामे पुर्ण झाली आहेत. आ. जगताप हे नागरीकांच्या सुख, दुःखात सहभागी होत असल्याने नागरीकांचा विश्वास त्यांनी संपादन केला आहे. त्यांच्याप्रती असलेल्या जिव्हाळयामुळेच ठिकठिकाणी त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात येत आहे.

विजय गव्हाळे
मा. नगरसेवक

# मिसेस महाराष्ट्र स्पर्धेत प्रतिक्षा जगताप टॉप १४ मध्ये!

## पळव्याच्या लेकीचे कर्तृत्व

**पळवे खुर्द : प्रतिनिधी**

**राज्य पातळीवर आयोजित करण्यात आलेल्या मिसेस महाराष्ट्र या स्पर्धेत मुळच्या पळवे खुर्द येथील प्रतिक्षा जगताप हिने कर्तृत्व गाजवत या स्पर्धेत टॉप १४ मध्ये स्थान पटकाविले आहे.**



राज्यातील प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या स्पर्धेत विवाहित महिलांना त्यांच्या व्यक्तिमत्वाचे प्रदर्शन करण्याची संधी उपलब्ध होते. या स्पर्धेत बाहय सौंदर्य नव्हे तर व्यक्तिमत्वातील आत्मविश्वास, जबाबदारी, आणि विविध क्षेत्रातील कौशल्ये यावर विशेषतः भर दिला जातो.

विवाहित महिलांना एक व्यासपीठ मिळावे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे. या स्पर्धेत विवाहित महिला त्या त्यांच्या क्षमता दाखवू शकतील आणि सामाजातील सकारात्मक बदलांचे प्रतीक बनू शकतील. या प्रवासामध्ये स्वतःला अधिक ओळखण्याची, आत्मविश्वास वाढविण्याची आणि समाजातील इतर महिलांना प्रेरित करण्याची संधी उपलब्ध होत असल्याचे प्रतिक्षा जगताप हिने सांगितले.

### लोकप्रिय व्यक्तिमत्व होण्याची संधी

ही स्पर्धा जिंकल्यानंतर मला केवळ समाजसेवा आणि महिला सक्षमिकरणासाठीच नव्हे तर मनोरंजन क्षेत्रातही विविध संधी उपलब्ध होतील. मला चित्रपट आणि दुरचित्रवाणी मालिकांमध्ये काम करण्याची संधी मिळू शकेल. आणि माझ्या लोकप्रियतेचा उपयोग करून मी विविध ब्रँडसोबत जसे की ज्वेलर्ससाठी फोटोशूटमध्ये सहयोग करू शकेल. या स्पर्धेत विजेतेपद मिळाल्यानंतर एक लोकप्रिय व्यक्तिमत्व होण्याची संधी मला मिळेल, ज्यादवारे मी समाजातील सकारात्मक बदल आणि प्रेरणा देणारी भूमिका बजावू शकेल असा विश्वास प्रतिक्षा जगताप हिने व्यक्त केला.

### मला पाठींबा, आशीर्वाद हवा

ही स्पर्धा जिंकल्यानंतर माझ्या व्यक्तिमत्वाच्या विविध पैलूंचा विकास होईल आणि त्याच बरोबर समाजासाठी आणि मनोरंजन क्षेत्रात माझे योगदान देण्याची संधी मिळेल. या संधीसाठी मला सर्वांचा आशीर्वाद आणि पाठींबा मिळावा अशी आशा आहे. या स्पर्धेत मला यश मिळविण्यासाठी तुम्ही मतदान करावे अशी मी विनंती करते.

प्रतिक्षा जगताप

# देवदैठणच्या खेळाडूंना स्पोर्टस् शुजची अनोखी भेट!

## शालेय विभागस्तर स्पर्धेत यश । क्रीडाशिक्षकांना हेड माईक व स्पिकर भेट



**सुपा : प्रतिनिधी**

**श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील खेळाडूंनी विभागीय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल सरपंच जयश्री गुंजाळ, उद्योजक विश्वास गुंजाळ यांच्या अवधूत ऑटो कंपोनेंट्सच्या वतीने स्पोर्ट्स शूज व मार्गदर्शक क्रीडाशिक्षक संदीप घावटे यांना हेड माईक व स्पिकरची अनोखी भेट देण्यात आली आहे.**

पुणे (बालेवाडी ) येथील शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे नुकत्याच पुणे विभागीय शालेय मैदानी स्पर्धा संपन्न झाल्या . या स्पर्धेत देवदैठण येथील आठ व अळकुटी येथील एक असे ९ खेळाडू सहभागी झाले होते. या स्पर्धेत खेळाडूंनी चमकदार कामगिरी करत राज्यस्तरावर झेप घेण्याची परंपरा अखंडीतपणे सुरु ठेवली आहे.

या स्पर्धेत प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावत राज्यस्तरावर पोहोचलेली जान्हवी वाघमारे,रुद्र लोखंडे ,अळकुटी येथील ज्ञानेश्वरी लामखडे ,तृतीय क्रमांक मिळवणारे वेदिका धावडे , नागेश्वरी वाघमारे, तसेच सहभागी झालेले समीक्षा वाळुंज, प्राजक्ता पवार, सोहम बोरुडे , कोमल बनकर अशा नऊ खेळाडूंना खेळातील कामगिरी उंचावण्यासाठी तसेच त्यांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने देवदैठण गावच्या विद्यमान सरपंच जयश्री गुंजाळ, उद्योजक विश्वास गुंजाळ यांच्या अवधूत ऑटो कंपोनेंट्सच्या वतीने २० हजार रुपये किंमतीचे उच्च प्रतीचे स्पोर्ट्स् शूज तसेच क्रीडाशिक्षक संदीप घावटे यांना मैदानावर वापरता येईल व खेळाडूंना सूचना देण्यासाठी हेड माईक व स्पिकर भेट म्हणून दिला.

यावेळी उद्योजक विश्वास गुंजाळ ,माजी सरपंच काशिनाथ कौठाळे, माजी उपसरपंच वसंत बनकर व निलेश गायकवाड,ओंकार रायकर यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### देवदैठणमधील खेळाडू दरवर्षी क्रीडा शिक्षक

संदीप घावटे यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडाक्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी करत राज्यस्तर स्पर्धेत दाखल होतात. राज्यस्तरावर उत्कृष्ट कामगिरी होऊन राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड व्हावी या हेतूने खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे. खेळाडूंना सर्वतोपरी मदत करत आहोत.

विश्वास गुंजाळ
उद्योजक, अवधूत ऑटो कंपोनेंट्स.

# उच्चशिक्षणात झावरे बंधूंची गुणवत्ता कौतुकास्पद

## संतोषशेठ रसाळ यांचे प्रतिपादन

**निघोज : प्रतिनिधी**

**श्रीकांत झावरे व प्रशांत झावरे या झावरे बंधूंनी उच्च शिक्षण घेऊन झावरे कुटुंबाचा नावलौकिक वाढवला असून त्यांची गुणवत्ता कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त तथा पारनेर तालुका कांदा व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी संतोषशेठ रसाळ यांनी व्यक्त केले आहे.**



पत्रकार संघ विभागीय कार्यालय निघोज यांच्या वतीने श्रीकांत बाजीराव झावरे हे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले व त्यांची मुंबई मंत्रालयात सहाय्यक कक्ष अधिकारी निवड झाल्याबद्दल त्यांचा मुंबई येथील व्यवसायिक देवराम महाराज लामखडे व संतोषशेठ रसाळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी ते बोलत होते.

यावेळी सेवानिवृत्त शिक्षक बाजीराव झावरे, श्री. स्वामी समर्थ सहकारी बँकेच्या संचालिका संजना झावरे, पुणे येथील नामांकित कंपनीत कार्यरत असलेले प्रशांत झावरे, पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्तात्रय उनवणे, पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे खजिनदार सागर आतकर, गणेश लामखडे आदी उपस्थित होते.

रसाळ यावेळी म्हणाले सेवानिवृत्त शिक्षक बाजीराव झावरे व श्री. स्वामी समर्थ सहकारी बँकेच्या संचालिका संजना झावरे यांचे दोन्ही चिरंजीव श्रीकांत व प्रशांत हे उच्चशिक्षीत व सुसंस्कृत आहेत. त्यांनी विशेष करून गावचा व झावरे कुटुंबाचा नावलौकिक वाढविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. आजच्या युवकांनी उच्च शिक्षण घेण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे. निघोज व परिसरात गेली दहा ते पंधरा वर्षात राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत अनेक विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शैक्षणिक कार्यासाठी महत्वपूर्ण काम करीत सरकारच्या विविध विभागांमध्ये उच्च अधिकारी म्हणून कार्यरत झाले आहे ही गावच्या दृष्टीने भूषणास्पद बाब असल्याचे ते म्हणाले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्तात्रय उनवणे यांनी केले तर पत्रकार सागर आतकर यांनी आभार मानले.

# राळेगणसिध्दीत राजकारण विरहीत क्रिकेट स्पर्धा!

## भैरवनाथ क्रिकेट क्लबला विजेतेपद

**राळेगणसिध्दी : प्रतिनिधी**

**गावातील तरूणांना एकत्र आणण्याच्या हेतूने मातोश्री लक्ष्मीबाई हजारे व स्वर्गीय बंडू मापारी स्मृती प्रतिष्ठाणच्या वतीने राजकारण विरहीत क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. भैरवनाथ क्रिकेट क्लब, बंडू वॉरीअर्स या संघाने या स्पर्धेत विजतेपद पटकाविले.**



ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे तसेच शिवभक्त बंडू मापारी स्मृती प्रतिष्ठाणने अध्यक्ष जे.डी. मापारी यांच्या उपस्थितीत, सरपंच जयसिंग जयसिंग मापारी, मा. सरपंच लाभेष औटी, कमिशनर गणेश पोटे, उद्योजक सुरेश पठारे यांच्या उपस्थितीमध्ये स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला. अण्णा हजारे यांनी या उपक्रमाचे कौतुक करत तरूणांना एकत्र आणण्यासाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांबददल त्यांनी समाधान व्यक्त केले.

या स्पर्धेत राळेगणसिध्दी परिसरातील १६ क्रिकेट संघांनी सहभाग नोंदविला. दोन दिवसांच्या कालखंडात सर्वच संघानी खिलाडू वत्तीचे प्रदर्शन घडवित उपस्थितांची वाहवा मिळविली. प्रथम क्रमांक भैरवनाथ क्रिकेट क्लब बंडू वॉरीअर्स, व्दितीय क्रमांक खंडेश्वर क्रिकेट क्लब तर तृतीय क्रमांक रांडोह वॉरीअर्स या संघाने पटकविला.

### विजेत्या संघांना बक्षिसे

विजेतेपद पटकविणाऱ्या संघाला ६ हजार रूपयांचे स्व. बंडू मापारी व अमोल मापारी मित्र मंडळाच्या वतीने, उपविजेत्या संघास ५ हजार स्वप्निल गुडडू गाजरे पाटील यांच्या वतीने, तिसऱ्या क्रमांकावरील संघास ४ हजार स्व. प्रकाश कांदेकर कुटूंबियांच्या वतीने तर चौथ्या क्रमांकाच्या संघास ३ हजार रूपयांचे बाळसाहेब फटांगडे व गणेश फटांगडे यांच्या वतीने बक्षिसे देण्यात आले. वैयक्तीक बक्षिसे – पहिला षटकार, हॅट्रीक, रेकॉर्ड, पहिला चौकार रेकॉर्ड, पहिला सिक्सर हॅट्रीक रेकॉर्ड, सर्वोत्तम संध, सर्वोत्तम बॉलर, सर्वोत्तम बॅटसमन आदी वैयक्तीक बक्षिसेही देण्यात आली.

# विकासासाठी जगतापांच्या विजयाची हॅट्रीक हवी!

## जगताप यांच्यामुळे नगरच्या क्रीडा क्षेत्राला चालना । हमाल पंचायतचे अध्यक्ष अविनाश घुले यांचे प्रतिपादन

**नगर : प्रतिनिधी**

**नगर शहराच्या सर्वांगिण विकासासाठी आमदार संग्राम जगताप यांच्या विजयाची हॅट्रीक आवश्यक असल्याचे प्रतिपादन हमाल पंचायतचे अध्यक्ष तथा खेळाडू अविनाश घुले यांनी केले. दरम्यान,आ. जगताप यांच्यामुळे नगरच्या क्रीडा क्षेत्राला चालना मिळाल्याचेही घुले यांनी सांगितले.**

शहरातील सहकार क्रीडा या जुन्या क्रीडा संस्थेच्या वतीने महायुतीचे उमेदवार आ. संग्राम जगतात यांना पाठींबा जाहिर करण्यात आला, यावेळी घुले हे बोलत होते. क्रीडा भारतीचे प्रशिक्षिक अजय पवार, राजू निंबाळकर, राजेंद्र धिरडे, संजय क्षीरसागर, राजेश सबलोक, बाबरसर, साबळे सर, अजय चितळे, संजय ढोणे, आशुतोष कुकडे, राहुल चव्हाण, राहुल फुलसौंदर,राजेंद्र ससे, नितिन मरकड, सुनील विधाते, हेमंत थोरात, अभिजीत खोसे, प्रदीपक बहिरवाडे, राजेंद्र कुदळे, बाबा जाधव आदी खेळाडू यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना घुले म्हणाले, आ. संग्राम जगताप यांनी नेहमीच नगरच्या क्रीडा क्षेत्राला सहकार्य व प्रोत्साहन दिले आहे.शहरात होणाऱ्या क्रीडा स्पर्धांना आ. जगताप हे कायम सहकार्य करतात. जगताप यांच्या प्रयत्नांतून आणि पुढाकारातून नगर जिल्हयातील पहिले भव्य स्पोर्टस कॉम्प्लेक्सच्या उभारणीचे काम प्रगतीपथावर असून या कामासाठी राज्य सरकारकडून तब्बल २१ कोटींचा निधी मंजुर झाला असल्याचे घुले म्हणाले. यावेळी प्रशिक्षक गणेश औटी यांनी प्रास्ताविक केले तर हेमंत थोरात यांनी आभार मानले.




### सहकारने क्रीडा क्षेत्राचा वारसा जपला

नगरच्या अनेक राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय खेळाडूंनी नगरचा नावलौकिक देशात, परदेशात उंचावला असून त्यात सहकार क्रीडा मंडळाचे योगदान मोठे आहे. येणाऱ्या काळात शहरात चांगले खेळाडू तयार व्हावेत,भावी पिढीसाठी शहरात चांगली मैदाने उपलब्ध व्हावीत यासाठी अद्यावत व सर्व सोयी सुविधांयुक्त भव्य स्पोर्टस कॉम्प्लेक्स उभारले जात आहे. नगरच्या ऐतिहासिक वाडीयापार्क मैदानाच्या विकासासाठी ५१ कोटींचा निधी प्राप्त झाल्याने या मैदानावर खेळाडूंना लवकरच अद्यावत व चांगल्या सुविधा मिळणार आहेत. नगरचा क्रीडा क्षेत्राचा वारसा सहकार क्रीडा मंडळ उत्तम प्रकारे जपत असून खेळाडूंना प्रोत्साहन देऊन घडविण्यात येत आहे.

आमदार संग्राम जगताप, विधानसभा सदस्य

### वाडिया पार्कसाठी ५१ कोटी

नगरची शान असलेल्या ऐतिहासिक वाडिया पार्क मैदानाच्या नुतनीकरणासाठी ५१ कोटी रूपयांचा निधी आ. संग्राम जगताप यांनी मंजुर करून आणला असून क्रीडा क्षेत्रात झालेल्या दोन मोठया कामांमुळे नगरच्या क्रीडा क्षेत्राला चालना मिळणार आहे. त्यातून नव नवीन खेळाडू निर्माण होणार आहेत.

# सहकार चळवळीच्या माध्यमातून ग्रामविकासाची संकल्पना महत्वपूर्ण - अमृताशेठ रसाळ

## दूध संस्थेच्या सभासदांना लाभांश वाटप

**निघोज : प्रतिनिधी**

**सहकार चळवळीच्या माध्यमातून जनतेला पाठबळ मिळाले असून ग्रामविकासासाठी सहकार चळवळ महत्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्थेचे उपाध्यक्ष,मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे कोषाध्यक्ष व मळगंगा कंट्रक्शनचे संस्थापक अध्यक्ष अमृताशेठ रसाळ यांनी व्यक्त केले आहे.**



भैरवनाथ दूध सहकारी संस्थेच्या वतीने सभासदांना लाभांश व बोनस वाटप अधिकारी व कर्मचारी यांना बोनस व मिठाईचे वाटप तसेच आदर्श दूध उत्पादकांचा सत्कार रसाळ यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. भैरवनाथ दूध सहकारी संस्थेचे चेअरमन खंडूजी भुकन या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष सोमनाथ वरखडे, गाथा फूड प्रॉडक्टचे संचालक अरुणशेठ लंके, मंगेश लंके, दत्तात्रय भुकन, नवनाथ शेटे, भिमाजी शेटे, देवा भुकन, माजी उपसरपंच शांताराम बोदगे , संस्थेचे मॅनेजर बाबाजी वरखडे आदी तसेच ग्रामस्थ व दूध उत्पादक शेतकरी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रसाळ यावेळी म्हणाले सहकारी पतसंस्था असोत की दूध संस्था या माध्यमातून निघोज आणी परिसराचा मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. तसेच दूध व्यवसायाला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली असून यामुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक समृद्धी झाली आहे. भैरवनाथ दूध संस्था सुरु ठेवण्याचे काम खंडूजी भुकन व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले असून यासाठी त्यांचे मोठे योगदान आहे. दूधाला चांगला भाव मिळाला पाहिजे तसेच दूध उत्पादक शेतकऱ्यांना कमी भावात पशू खाद्य देण्यासाठी सरकारने शेतकरी हिताच्या योजना राबविण्याची गरज असल्याचे प्रतिपादन रसाळ यांनी व्यक्त केले आहे.

भैरवनाथ दूध सहकारी संस्थेचे चेअरमन खंडूजी भुकन यावेळी म्हणाले गेली चाळीस वर्षांपूर्वी भैरवनाथ दूध सहकारी संस्थेची स्थापना झाली या दूध संस्थेच्या माध्यमातून या भागात दूध व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढला. दूध उत्पादक शेतकऱ्यांना पाठबळ मिळाले म्हणून आजपर्यंत ही संस्था उर्जीतअवस्थेत येण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. सहकारी संस्था टिकल्या तरच शेतकरी वाचेल ही भुमिका महत्वाची असल्याचे भुकन यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्तात्रय भुकन यांनी केले. शेवटी माजी भैरवनाथ दूध सहकारी संस्थेचे मॅनेजर बाबाजी वरखडे यांनी आभार मानले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com